# B.K. BIRLA CENTRE FOR EDUCATION

SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS
A CBSE DAY-CUM-BOYS' RESIDENTIAL SCHOOL

## TERM-1 EXAMINATION (2026-27)

**MARATHI SET-ONE**

Class : V | Duration: **3** Hrs
Date : 12.09.2026 | Max. Marks: **80**
Admission No.: | Roll No.:

---

कृतिपत्रिकेसाठी सूचना :

(1) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

---

## विभाग – अ (वाचन व आकलन)

**प्र 1 खालील अपठित उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहाः–** (5X1=5)

फार –फार वर्षापूर्वीची गोष्ट आहे .एके वर्षी पावसाळयात पाऊस पडलाच नाही. त्यामुळे दुष्काळ पडला. सगळे तलाव आटले. प्राणी पाण्याच्या शोधात सगळीकडे भटकू लागले. एका अरण्यात एक हत्तीचा कळप होता. त्यांनाही पुरेसं पाणी प्यायला आणि अंघोळ करायला मिळेना. तेव्हा तहानेने व्याकूळ झालेले हत्ती आपल्या कळपाच्या प्रमुखाला म्हणाले, स्वामी आपण जगायचे कसे ? प्रमुखाने जवळच्या अरण्यातील पाण्याने भरलेला एक तलाव आपल्या कळपाला दाखविला. त्या तलावातील पाणी अगदी स्वच्छ, गोड होतं.

(1) कोण पाण्याच्या शोधात भटकू लागले ?

**अ** पक्षी **ब** प्राणी **क** मनुष्य

(2) एके वर्षी काय पडला नाही?

**अ** पाऊस **ब** बर्फ **क** गारा

(3) अरण्यात कोण राहत होते ?

**अ** वाघ **ब** कोल्हा **क** हत्ती

(4) तलाव कोठे होता ?

**अ** अरण्यात **ब** घरात **क** शाळेत

(5) तलावाचे पाणी कसे होते ?

**अ** गरम **ब** थंड **क** स्वच्छ व गोड

**प्र 2 अपठित पदयांश –** **(5)**

बिनभिंतीची उघडी शाळा

लाखो इथले गुरू

झाडे,वेली,पशू पाखरे

यांशी गोष्टी करू

बघू बंगला या मुंग्यांचा

सूर ऐकू या त्या भुंग्यांचा

फुलांफुलांचे रंग दाखवित

फिरते फुलपाखरू..........

हिंडू ओढे,धुंडू ओहळ ,

झाडावरचे काढू मोहळ

चिडत्या डसत्या मधमाश्यांशी

जरा सामना करू

(1) बिनभिंतीच्या शाळेत किती गुरू आहेत?

**अ** हजारों **ब** शंभर **क** लाखो

(2) कोणाचा बंगला बघायचा आहे ?

**अ** श्रीमंताचा **ब** मुंग्याचा **क** चिमण्यांचा

(3) मधमाश्या कशा आहेत?

**अ** चिडत्या **ब** मोठया **क** छोटया

(4) मोहळ कोठे आहे ?

**अ** घरावर **ब** झाडावर **क** इमारतीवर

(5) फुलांफुलांचे रंग कोण दाखवते ?

**अ** फुलपाखरू **ब** मधमाशी **क** भुंगा

## खंड ख –व्याकरण

**प्र 3 – समानार्थी शब्द लिहा – (कोणतेही दोन)** **(2)**

(1) पंख =

(2) जग =

(3) हात =

**प्र 4 विरुध्दार्थी शब्द लिहा – (कोणतेही दोन)** **(2)**

(1) थंड x

(2) जास्त x

(3) वर ×

**प्र 5 लिंग बदला – (कोणतेही दोन)** **(2)**

**(1)** मित्र =

**(2)** तरूण =

(3) बाबा =

**प्र 6 वचन बदला –(कोणतेही दोन)** **(2)**

**(1)** डोळा =

**(2)** पुस्तक =

(3) पाने =

**प्र 7 वर प्रत्यय लावून नवीन शब्द बनवा :–** **(2)**

**(1)** झाडा + वर =

**(2)** टेबलर + वर =

**प्र 8 खालील वाक्यातील सर्वनामे ओळख ओळखा –** **(2)**

**(1)** मी व श्याम मित्र आहे .

**(2)** संगीता मला पुस्तक देणार आहे.

**प्र 9 काळ ओळखा –** **(2)**

**(1)** आई गावाला गेली .

**(2)** उदया मी गावाला जाणार.

**प्र 10 खालील वाक्यातील कियापदे ओळखा –** **(2)**

**(1)** आम्ही सर्व एका वर्गात शिकतो .

**(2)** मी उदया मुंबईला जाणार .

**.खंड ग –साहित्य**

**प्र 11 पठित गदयाश –** **(5)**

खूप वर्षांपूर्वी गंगानदीच्या काठी एक घनदाट जंगल होते. जंगलाच्या मधोमध एक तलाव होता. जंगलात अनेक प्राणी राहत होते. त्यात हरणांची संख्या जास्त होती. त्यांना पाणी पिण्यासाठी तो एकच तलाव होता. मात्र सिंह ,वाघ,कोल्हा इतरही अनेक जनावरे होती. त्यामुळेच हरणं कळपाने राहत. दुपारी सर्व प्राणी झोपी जात तेव्हा हा हरणांचा कळप तलावाकडे पाणी पिण्यासाठी येत असे.

**प्रश्न –**

**(1)** जंगलात कोणाची संख्या जास्त होती?

**(2)** जंगल कोठे होते?

**(3)** जंगलाच्या मधोमध काय होता ?

**(4)** हरणं कशी राहत ?

**(5)** हरणांचा कळप केव्हा पाणी पिण्यासाठी तलावाकडे जात असे ?

**प्र 12 पठित पदयाश –** **(5)**

मज आवडते, माझाी शाळा
जिव्हाळयाची, मायेची
ज्ञान देते, जवळ घेते
जशी जननी बाळा

कधी प्रेमाने ,कधी रागाने
तिनेच सारे ज्ञान दिले
पंखाखाली,घेऊन तिने
मज जगण्याचे भान दिले

अशी ही माझी शाळा
कधी हसवी, कधी रडवी
आठवणींची शिदोरी घेऊन
जीवनाच्या वाटेवर चालणे शिकवी

**प्रश्न –** **(1)** शाळा काय देते ?

**(2)** कवीला कोण आवडते ?

**(3)** शाळेने कशाची शिदोरी दिली ?

**(4)** जननीची उपमा कोणाली दिली आहे ?

**(5)** शाळेने पंखाखाली घेऊन काय केले?

**प्र 13 जोडया लावा –** **(4)**

**1** नगर – खूप

**2** गोड – मंदिर

**3** पुष्कळ – शहर

**4** देऊळ – मधुर

**प्र 14 रिकाम्या जागी योग्य शब्द भरा –** **(4)**

**(ओटीवर/प्रार्थनेला/ कांती /उपकरण)**

**(1)** आज विज्ञानयुगात बरीच –––––– झाली आहे.

**(2)** भ्रमणध्वनी हे एक इलेक्ट्रानिक ––––– आहे.

**(3)** सारे –––––– बसले

**(4)** वडील –––––गेले.

**प्र 15 कोण कोणास म्हणाले ते लिहा –** **(2)**

**(1)** तुला नाही का रे आवडली भाजी ?

**(2)** तो आता इंग्रजी शिकायला लागला ना?

**प्र 16 खालील प्रश्नांची उत्तरे लिहा – (कोणतेही सहा)** **7x2**=14

(1) रताळयाच्या पानांची भाजी कोणी केली होती?

(2) घरी येताना गणपतीचे तीर्थ कोण आणत असे?

(3) शिकाऱ्याने काळया हरणाला का सोडून दिले ?

(4) एकदा जंगलात कोण आले?

(5) शेताता कोण राबतो ?

(6) कवडयाच्या माळा कोणाच्या गळयात आहेत ?

(7) भ्रमणध्वनीला इंग्रजीत काय म्हणतात ?

(8) शरीरात लठ्ठपणा कशामुळे वाढतो ?

(9) उंच निशान कशाचे फडकत रहावे ?

**प्र 17 जाहीरात लेखन –** **(5)**

आपल्या आवडत्या वस्तूसाठी एक आकर्षक जाहीरात तयार करा :–

**प्र 18 निबंध लेखन –( कोणताही एक)** **(5)**

1 माझी आई    2 माझा मित्र    3 माझी बाग

**प्र 19 स्वपरिचय लिहा –** **(5)**

**प्र 20 पत्र लेखन –** **(5)**

आपली खुशाली कळविणारे पत्र बाबांना लिहा :–'

**किंवा**

आपल्या वाढदिवसाचे निमंत्रण देणारे पत्र मित्रास लिहा :–

**:::::::::::::::::::::: समाप्त ::::::::::::::::::::::::::::**